# HGH INDIA® 2025

17th Edition

HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE

July 01-04, 2025. Bombay Exhibition Center, Mumbai

# NEWS 1

A TEXZONE Event

Where business feels at home!

# भविष्याचा वेध!

सातत्याने बदलत आणि विकसित होत असलेल्या HGH India च्या १७ व्या आवृत्तीचे मुंबईत आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये नाविन्यपूर्ण उत्पादने, मार्केट ट्रेंड्स, सोर्सिंगच्या संधी तसेच व्यवसायाच्या नव्या कल्पना यांचा अनुभव घेता येणार आहे. ७०० ब्रँड्स आणि भारत व ३२ देशांतील उत्पादक त्यांची नवी उत्पादनश्रेणी यावेळी सादर करणार असून HGH India इथल्या २५०० होम प्रॉडक्ट्ससह रिटेलर्स, वितरक, ओईएम खरेदीदार, आर्किटेक्ट्स व इंटेरियर डिझायनर्ससाठी खजिना ठरणार आहे.

१०० वितरक यावेळी पहिल्यांदाच सहभागी होत असून HGH India तुम्हाला नवे पुरवठादार मिळवून देण्यासाठी सज्ज आहे. आंतरराष्ट्रीय एक्झिबिटर्समध्ये इटलीचे फर्निशिंग फॅब्रिक्स, युक्रेनचे वॉलपेपर्स, युकेचे ऑर्गनायझर्स, कोरियामधून स्टोअरेज, बेल्जियमचे कुकवेयर, अमेरिकेचे डिनरवेयर आणि इतर विविध गोष्टींचा समावेश असेल. ग्राहक आणि जीवनशैलीशी संबंधित ट्रेंड्स लक्षात घेऊन या ट्रेड शोमध्ये होम टेक्स्टाइल, घर सजावट, फर्निचर, हाउसवेयर आणि गिफ्ट्स यांची अद्ययावत श्रेणी भारतीय ट्रेड बायर्ससाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. भारतातील ६९० शहरे आणि ३२ देशांतून तब्बल ४५,००० ट्रेड व्हिजिटर्स या ट्रेड शोला भेट देतील असा अंदाज आहे. HGH India १ ते ४ जुलै २०२५ दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे भरवले जाणार आहे.

१७ व्या HGH India मध्ये घराशी संबंधित उत्पादनांच्या भविष्यवेधी पैलूंवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यामुळे रिटेलर्सना भविष्यात ग्राहकांच्या काय मागण्या असतील


Pollination


Fig Living


F&F


Spread Home


Aksa

## महत्त्वाची वैशिष्ट्ये

- चार हॉल्समध्ये मिळून ७०० ब्रँड्स आणि उत्पादक
- होम टेक्स्टाइल्स, फर्निशिंग फॅब्रिक्स, होम डेकॉर, होम फर्निचर आणि हाउसवेयर एकाच छताखाली
- आघाडीच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सची उपस्थिती
- भारत आणि ३२ देशांतील एक्झिबिटर्स
- ट्रेंड्स २०२५- २६ – इमोशन्स इन मोशन
- स्मार्ट किचन – भारतीय स्वयंपाकघरांचे भविष्य


Le Creuset


Awkenox

कंटेम्परररी | फ्युचरिस्टिक | सस्टेनेबेल

याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे तयार राहाता येईल. नाविन्यपूर्ण साहित्य (मटेरियल), अद्ययावत तंत्रज्ञान आणि आगामी ट्रेंड्सचा अंदाज घेत तयार करण्यात आलेले अत्याधुनिक होम टेक्स्टाइल, फर्निशिंग फॅब्रिक्स, रग्ज, मॅट्रेसेस, होम फर्निचर, असेंट आणि डेकॉर, जीवनशैलीनुसार हाउसवेयर रिटेलर्स व वितरकांना सर्वसमावेशक होम कलेक्शन्स सोर्स करणे शक्य होईल.

भारतातील होम रिटेलिंग क्षेत्राची समीकरणे नव्याने प्रस्थापित होत आहेत. हे क्षेत्र जागतिक स्तरावरील कंपन्या, रिटेलर्सचे सर्व प्रकार – ऑनलाइन, ऑफलाइन, हायपर मार्केट्स, डिपार्टमेंट स्टोअर्स, स्पेशॅलिटी रिटेलर्स, बुटिक्स आणि फ्रँचाईझीपासून प्रेरणा घेत आहे. त्यातून त्यांचे मर्चंडाइज मिक्स, मार्केटिंग व रिटेलच्या पद्धती लक्षात घेत ग्राहकांना एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सुविधा देणे शक्य होईल. HGH India ने या सुविधा उपलब्ध करण्यासाठी योग्य एक्झिबिटर्सचा समावेश केला आहे. हे एक्झिबिटर्स डिझाइन, उत्पादने, साहित्य, दर्जा आणि सुविधा अशा विविध क्षेत्रांतील आहेत. या ट्रेड शो मुळे रिटेलर्सना त्यांच्या स्टोअरमध्ये नवी उत्पादने उपलब्ध करत व्यवसाय अधिक शाश्वत बनवता येईल तसेच जास्त नफाही कमावता येईल.

सस्टेनिबिलिटी पॅव्हेलियनपासून ऑम्नी रिच झोनपर्यंत HGH India द्वारे होम रिटेल क्षेत्रातील तरुण भारतीय ग्राहकांची विचारसरणीशी सुसंगत नव्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. हॉल ६ मधील सस्टेबिलिटी पॅव्हेलियनमध्ये रिसायकल केलेले शाश्वत साहित्य आणि शाश्वत प्रक्रिया वापरून तयार केलेली वेगवेगळ्या प्रकारची होम प्रॉडक्ट्स मिळतील. ही उत्पादने पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी सुसंगत आहेत. हॉल ६ मधील ऑम्नी रिच झोन ऑनलाइन आणि ऑफलाइन कंपन्या एकमेकांच्या कार्यक्षेत्रात येण्यासाठी, परस्परपूरक काम आणि व्यावसायिक नातेसंबंधांसह दोन्ही बाजूंच्या ग्राहकांना सेवा देतील.

२०२५- २६ साठी होम फॅशन ट्रेंड्स यावेळी इमोशन इन मोशन या आकर्षक थीमअंतर्गत खास तयार करण्यात आलेले ट्रेंड बुक, ट्रेंड पॅव्हेलियन आणि ट्रेंड सेमिनार्समधून सादर केले जातील. व्हिजिटर्सना त्यांच्या अर्जासह हॉल ६ मधील ट्रेंड्स पॅव्हेलियनमध्ये ट्रेंड्स प्रत्यक्ष पाहाता येतील. शो नंतर तुम्हाला १५०० रुपयांच्या वाजवी शुल्कामध्ये ट्रेंड बुक खरेदीही करता येऊ शकते. ट्रेंड सेमिनार्समुळे थेट ट्रेंड डिझाइन टीमच्या क्युरेटर्सकडून आगामी ट्रेंड्स समजून घेता येतात.

HGH India च्या व्हिजिटर्सना हॉल ६ मधील डिजि लाउंज या एआयवर आधारित सर्जनशील आणि इंटरअक्टिव्ह विश्वात जाता येणार असून तिथे त्यांना डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने भविष्यातील घरे कशी असतील याचा इमर्सिव्ह अनुभव घेता येणार आहे.

या आवृत्तीमध्ये होम टेक्स्टाइल आधीच्या हॉल १ मधून नव्या, खांब नसलेल्या हॉल ६ मध्ये शिफ्ट करण्यात आले आहेत. हॉल ६ मध्ये होम फर्निशिंग फॅब्रिक्स, वॉलपेपर्स, ब्लाइंड्स, बेडशीट्स, बेडसेट्स, ब्लँकेट्स, कम्फर्टर्स, क्विल्ट्स, टॉवेल्स, डेकोरेटिव्ह मेडअप्स म्हणजे कुशन कव्हर्स आणि पडदे, टेबल व किचन लिनन, मॅट्रेसेस, उशा, मॅट्रेसेस प्रोटेक्टर्स, हँडलूमचे होम

## HGH India मध्ये नवीन

- होम टेक्स्टाइल आता नव्या हॉल ६ मध्ये
- ऑम्नी रीच झोन – ऑनलाइन- ऑफलाइन संधींमध्ये ताळमेळ
- HGH India इंटरॅक्टिव्ह नॉलेज शेयरिंग सेशन
- सस्टेनिबिलिटी पॅव्हिलियन
- डिजि लाउंज – भविष्यवेधी घरांचा अनुभव घ्या

## सरकारचा पाठिंबा

- एमएसएमईचे सहकार्य
- डीसी हँडीक्राफ्ट, डीसी हँडलूम, टेक्स्टाइल मंत्रालयाचे सहकार्य
- उत्तर प्रदेश, हरियाणा आणि राजस्थान सरकारचे सहकार्य
- HEPC, CEPC, NDC, NEHHDC, EUPEA यांची पॅव्हेलियन्स


Topman


Pluchi




भारतातील तरुण ग्राहक परंपरा, आधुनिक फॅशन, अद्ययावत तंत्रज्ञान आणि जागतिक प्रभावाच अगदी सहजपणे त्यांच्या जीवनशैलीत मेळ घालतात. इमोशन इन मोशन हा HGH India च्या टीमने संशोधनातून तयार केलेला ट्रेंड फोरकास्ट २०२५-२६ आहे. त्यांअंतर्गत रंग, डिझाइन, मटेरियल व स्टाइल्ससंदर्भात होम फॅशन क्षेत्रात येणाऱ्या ट्रेंडची सर्वसमावेशक माहिती देण्यात आली आहे.

आमचे इमोशन इन मोशन ट्रेंड्स चार संकल्पनांमध्ये विभागण्यात आले आहेत – फ्युचर रिझ, मॅजेस्टिक लगून, बरगंडी ब्लूम आणि चाय अँड बिस्कीट.

मिलेनियल्स व जेन झी जास्त वैयक्तिक अनुभव देणाऱ्या,

# ट्रेंड्स २०२५-२६

FUTURE FIZZ
फ्यूचर फिज्ज़



Majestic Lagoon
मैजेस्टिक लगून



Burgundy Bloom
बरगंडी ब्लूम





Chai & Biscuits
चाय एंड बिस्किट्स

अर्थपूर्ण आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळत आहे. एआयमधील तंत्रज्ञानविषयक सुधारणांमुळे घर सजावट, वैयक्तिक उत्पादन शिफारसी आणि उपयुक्तता, व्हर्च्युअल स्टेजिंग, सहज उपलब्धता यात क्रांती येत आहे. आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय वाढते उत्पन्न लक्झरी, प्रीमियम आणि वाजवी उत्पादनांच्या मागणीला चालना देत आहे.

ट्रेंड्स २०२५-२६ मध्ये अत्याधुनिक सामाजिक, जीवनशैली आणि तंत्रज्ञानविषयक बदल टिपण्यात आले असून त्याद्वारे प्रॉडक्ट डिझायनर्स, आर्किटेक्ट्स, इंटेरियर डिझायनर्स, ब्रँड्स, उत्पादक आणि रिटेलर्सना नवीन घर सजावटीची श्रेणी आणि मर्चंडायझिंग धोरण विकसित करण्यास मदत होते.

हॉल ६ मधील ट्रेंड्स पॅव्हेलियनला भेट द्या आणि खऱ्या उत्पादनांसह ट्रेंड्स साकार होताना अनुभवा. तुम्हाला ट्रेंड्स पॅव्हेलियन आणि इन्फर्मेशन बुथसमध्ये रू. १५०० किंमतीला ट्रेंड बुकची कॉपी खरेदी करता येईल. होम फॅशनचं भविष्य जाणून घेण्याचा तुमचा प्रवास इथे सुरू होतो.

टेक्स्टाइल्स, ट्रेंड्स पॅव्हेलियन, सस्टेनिबिलिटी पॅव्हेलियन आणि ऑम्नी रीच झोन यांचा समावेश असेल. हँडलूम एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या (HEPC) ३० उत्पादक आणि हाताने विणललेया होम टेक्स्टाइल्सच्या निर्यातदारांचा संघटित ग्रुपही या हॉलमध्ये असणार आहे. कार्पेट एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलद्वारे (CEPC) भादोही, वाराणसी, आग्रा आणि पानीपत अशा ठिकणाचे २० हँडमेड रग उत्पादक आणि निर्यातदार सहभागी होणार आहेत, तसेच मशिनने तयार केलेले रग्जही इथे असतील. त्याशिवाय या हॉलमध्ये ईस्टर्न उत्तर प्रदेश एक्स्पोर्टर्स असोसिएशनचे (EUPEA) हाताने एम्ब्रॉयडरी केलेल्या व हाताने विणललेल्या होम टेक्स्टाइलमधून आपली सर्जनशीलता दाखवतील.

हॉल ३ मध्ये घरात लागणाऱ्या फर्निचरपासून सजावटीच्या साहित्यापर्यंत सर्व काही सहजपणे उपलब्ध करून देण्यात येईल. इथे आघाडीचे फर्निचर ब्रँड्स सहभागी होणार असून त्यात बसंतमधून ऑरेंज ट्री, जोधपूरचे फर्निबा, नागपूरचे क्रिस्टल फर्निटेक, कटकचे साज, कन्नूरचे रूबको आणि मलप्पुरमचे (केरळ) लिली कल्ट यांचा समावेश आहे. इतर काही ब्रँड्सही सहभागी होणार असून ते आधुनिक पद्धतीचे सोफा, खुर्च्या, डायनिंग, कॉफी टेबल्स, साइड टेबल्स, आउटडोअर फर्निचर, युटिलिटी व अक्सेंट फर्निचर रिटेलर्स व आर्किटेक्ट्ससाठी उपलब्ध करतील.

एक्झिबिटर्स त्यांचे स्वतःचे ब्रँड्स उपलब्ध करणार असून ओईएमद्वारे रिटेलर्सना पुरवठा केला जाईल तसेच आर्किटेक्ट्स व इंटेरियर डिझायनर्सना कॉन्ट्रॅक्ट आणि प्रोजेक्ट वर्क सुविधा दिल्या जाणार आहेत. नेहमीचे फर्निचर रिटेलर्स व आर्किटेक्ट्सबरोबरच फर्निशिंग रिटेलर्स त्यांच्या मर्चडाइजमध्ये होम फर्निचरचा समावेश करण्यासाठी उत्सुक आहेत. फ्रँचाईझीमध्ये रस असणाऱ्यांना हा हॉल नक्कीच लक्षवेधक वाटेल.

असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्स (AFMT) यांच्या सहकार्याने हॉल ३ मध्ये इनडोअर आणि आउटडोअर होम फर्निचर उपलब्ध केले जाणार असून त्यांचा प्रमुख भर भारतात तयार करण्यात आलेल्या फर्निचरवर असेल. होम फर्निचरला भारतात असलेली मागणी दरवर्षी २० टक्क्यांनी वाढत आहे. ग्राहक मोठ्या प्रमाणावर कस्टमाइज्ड फर्निचरकडून रेडीमेड फर्निचरकडे वळत आहेत.

हॉल ३ मध्ये हँडीक्राफ्ट्स आणि धातूपासून तयार करण्यात आलेल्या सजावटीच्या वस्तू (चांदी, ब्रास, तांबे, स्टील, लोखंड), लाकूड, काच, पोर्सेलिन, कॉयर, बांबू, केन, रेझिन आणि इतर नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांपासून बनवण्यात आलेल्या वस्तू प्रदर्शनार्थ मांडल्या जातील. एक्झिबिटर्स ब्रँड्स, सजावटीचे लाइट्स, कलात्मक वस्तू, टेबल टॉप्स, घड्याळे, फुलदाणी, कँडल स्टँड्स, कृत्रिम झाडे, फुले व गवत, व्हर्टिकल गार्डन्स, डेकोरेटिव्ह फ्लोअरिंग यांचे उत्पादक व आयातदार, हँडीक्राफ्ट्स व सजावटीच्या विविध प्रकारच्या वस्तू यांचा समावेश करतील. नॅशनल डिझाइन सेंटर (NDC), नॉर्थ-ईस्टर्न सेंटर फॉर टेक्नोलॉजी अप्लिकेशन अँड रिच (NECTAR) आणि जम्मू अँड काश्मीर ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन (JKTPO) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या कारागिरांना एकत्रितपणे सहभागी होण्याची सोय करत बाजारपेठ मिळवून देण्याचे ठरवले आहे.

या हॉलमधील हँडीक्राफ्ट उत्पादक आणि कारागीर जम्मू आणि काश्मीर, मुरादाबाद, जोधपूर, जयपूर, आग्रा, मीरत, रांची, कटक, ईशान्येकडची राज्ये, पश्चिम बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, केरळ आणि इतर राज्यांचे प्रतिनिधीत्व


Ekaani


Designers Resource


Sapana


Shades of India

प्रॉडक्ट इनोव्हेशन पुरस्कार



HGH India ने सुरू केलेल्या H-Circle प्रॉडक्ट इनोव्हेशन पुरस्कारांचे हे चौथे वर्ष आहे. होम टेक्स्टाइल्स, घर सजावट, होम फर्निचर, हाइसवेयर आणि भेटवस्तू अशा क्षेत्रातील नाविन्यास प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार या क्षेत्रातील पडद्यामागच्या गुणवत्तेचा सन्मान करतात, शिवाय त्यांना राष्ट्रीय पातळीवर मुख्य बाजारपेठेसह जोडण्यासाठी मदत केली जाते. प्रस्थापित ब्रँड्सच्या नाविन्यालाही यामुळे चालना मिळत असून पर्यायाने निकोप स्पर्धेला वाव मिळत आहे.

डिझाइन, साहित्यातील नाविन्य, उपयुक्तता आणि घरगुती उत्पादनांसाठीचा अर्ज १७ व्या HGH India मध्ये पात्र असून त्यासाठी कोणतेही शुल्क लागू नाही. डिझाइनमधील नाविन्य, सौंदर्य, टिकाऊपणा, इकोलॉजी व व्यवहा४यता अशा निकषांवर प्रवेशिकांचे विश्लेषण केले जाणार आहे.

व्हिजिटर्सना सर्व नॉमिनेटेड उत्पादने त्यांची माहिती, कंपनीचे नाव आणि बुथ क्रमांकासह हॉल ६ मधील H-Circle नॉमिनेशन्स एरिनामध्ये पाहाता येतील. स्वतंत्र परीक्षक मंडळातर्फे विजेत्यांची निवड केली जाईल. या व्यावसायिक आणि अनुभवी परीक्षक मंडळाद्वारे पुरस्कारांसाठी आलेल्या भरघोस प्रवेशिकांचे विश्लेषण केले जाईल. HGH India च्या या आवृत्तीमध्ये चौथ्यांदा हे पुरस्कार दिले जाणार आहेत. त्यासाठी १ जुलै २०२५ रोजी H-Circle अवॉर्ड नाइटचे खास आयोजन करण्यात आले आहे. H-Circle पुरस्कार पूर्णपणे HGH India च्या आयोजकांद्वारे प्रायोजित करण्यात येत असून त्याला इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इंटेरियर डिझायनर्सचा (IIID) पाठिंबा लाभला आहे.

करतील. यातील बहुतेकांना डेव्हलपमेंट कमिशनर हँडीक्राफ्ट्स, भारत सरकारचे सहकार्य लाभले आहे. त्याप्रमाणे विविध भारतीय ब्रँड्स, उत्पादक व आयातदारांतर्फे आधुनिक, मशिनने तयार केलेल्या सजावटीच्या वस्तू सादर केल्या जातील.

HGH India तर्फे प्रायोजित इंडियन हेरिटेज पॅव्हेलियनमध्ये कारागिरीचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्याच्या मदतीने हस्तकारागिरी करण्यासाठी सन्मानित करण्यात आलेले राष्ट्रीय पुरस्कार विजेते ही प्रात्यक्षिके सादर करतील. HGH India च्या खरेदीदारांना कलाकुसरीच्या अनोख्या वस्तू थेट कारागिरांकडून घेता येणार आहेत.

गेल्या काही वर्षांत भारतीय उत्पादकांनी त्यांची डिझाइन्स, दर्जा, उत्पादनासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविदा आणि उत्पादन क्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करायला सुरुवात केली आहे. त्यातून अत्याधुनिक फर्निचर आणि सजावटीच्या वस्तू तयार केल्या जाणार आहेत. भारत सरकार काही फर्निचर उत्पादनांसाठी बीआयएस स्टँडर्ड बंधनकारक करत आहे. फेब्रुवारी २०२६ पासून ते लागू होणार असून भारतातील फर्निचर क्षेत्राला आयातीच्या वस्तूंसाठी पर्याय तयार करण्यासाठी व मेड इन इंडिया फर्निचरचा प्रसार करण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे.

१७ व्या HGH India हॉल ४ मध्ये हाऊसवेयर्स पाहायला



Spiegelau



Oodaii by Amaravathi Textiles

मिळणार असून त्यांचे किचनवेयर, किचन अप्लायन्सेस, कुकवेयर, टेबलवेयर, ग्लासवेयर, स्टोअरेज, क्लिनिंग, जनरल हाउसवेयर आणि प्लॅस्टिक उत्पादने असे उपविभाग केलेले असतील. आघाडीच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सद्वारे करण्यात आलेले हे आतापर्यंतचे सर्वात मोठे आणि आकर्षक सादरीकरण आहे. स्मार्ट किचन पॅव्हेलियनद्वारे आधुनिक भारतीय मॉड्युलर किचन त्यातील सर्व उपकरणे, किचनवेयर, कुकवेयर आणि युटिलिटीसह सादर केले जाणार आहे.

भारतीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्स फुड प्रोसेसर्स आणि सँडविच मेकर्स, प्रेशर कुकर्स व फ्राइंग पॅन्स, सुऱ्या आणि ग्रेटर्सपासून पीलर्सपर्यंत, किचन कंटेनर्स आणि भांडी, डिनरवेयर, कटलरी, बारवेयर इत्यादींची डिझाइन व उपयुक्ततेबाबत नवीन श्रेणी सादर करतील. ग्राहकांना स्टोअरेज, कंटेनर्स, ड्रिंकवेयर्स आणि बॉटल्स, बाथरूम अक्सेसरीज, क्लिनिंग व जनरल हाउसवेयर्स उत्पादने उदा- डस्टबिन्स, बकेट्स, टब्ज, कपड्यांसाठी ड्रायर्स, आयर्निंग बोड्र्स इ. उत्पादनांमध्ये नाविन्यपूर्ण प्रकार पाहायला मिळतील.

हाउसवेयर्सची एकंदरीत मागणी भारतीय बाजारपेठेत १५ टक्क्यांनी वाढली असून सध्या कार्यरत असलेल्या तसेच नव्या कंपन्यांसाठी ब्रँड व रिटेल पातळीवर व्यावसायिक संधी वाढल्या आहेत. HGH India मुळे या संधींचा चांगला लाभ घेण्याची संधी आहे.

## Smart Kitchen

an initiative by HGH India

हॉल ४ मधील स्मार्ट किचन पॅव्हेलियनमध्ये किचनवेयर, कुकवेयर, मॉड्युलर किचन्स आणि स्मार्ट अप्लायन्सेसमधील नाविन्यपूर्ण आणि स्वयंपाक बनवणे जास्त वेगवान, सोयीस्कर व निरोगी करणारी श्रेणी पाहायला मिळेल.

सोयीस्करपणा, स्वच्छता, सुरक्षित आरोग्याप्रती ग्राहकांच्या अपेक्षा वाढत असल्यामुळे उत्पादक स्मार्ट किचन अप्लायन्सेस, कुकवेयर आणि किचन टुल्स पुरवण्यावर भर देत आहेत. त्यात व्हॉइस असिस्टेड गॅजेट्सपासून मल्टी- फंक्शनल कुकवेयरपर्यंत समावेश आहे. चिरणं असो, ब्लेंडिंग, बेकिंग किंवा फुड स्टोअरेज असो, किचनमधील प्रत्येक कामातील प्रत्येक स्टेजमध्ये क्रांती घडवून आणली जात आहे.

भारतीय स्वयंपाकघरे आधुनिक भारतीय घरांच्या जीवनशैलीशी सुसंगत होत आहेत. प्रीमियम किचन अप्लायन्सेस आणि एयर फ्रायर, हॉट प्लेट्स, मायक्रोवेव, स्मार्ट चिमणी, हॉब्ज, इलेक्ट्रिकल कुकर, राइस कुकर अशा प्रकारची एकेकाळी लक्झरी समजली जाणारी कुकवेयर्स आता गरजेची झाली आहेत. मॉड्युलर किचन लेआउट्सपासून एआय- पॉवर्ड अप्लायन्सेसपर्यंत स्मार्ट किचन्स भारतीय घरांची स्वयंपाक करण्याची, जेवण्याची आणि जगण्याची पद्धत बदलत आहेत. यावर्षीच्या HGH India मध्ये व्हिजिटर्सना स्मार्ट किचन प्रत्यक्षात कसे चालते हे बघण्याची संधी मिळणार आहे. स्मार्ट कुकिंग सुविधा क्षेत्रातील आघाडीचा ब्रँड टीटीके प्रेस्टिज आणि मॉड्युलर किचन्स, वॉर्डरोब्ज व होम स्टोअरेज क्षेत्रातील स्पेशॅलिस्ट अल्ट्राफ्रेश मोड्युलर सोल्युशन्स यांनी हे किचन प्रत्यक्षात साकार केले आहे. प्रेस्टिज कुटुंबाचा भाग असलेल्या अल्ट्राफ्रेशद्वारे डिझाइन, उपयुक्तता आणि नाविन्य एकाच छताखाली सादर करण्यात येते.

रिटेलर्ससाठी वितरक आणि ट्रेड बायर्ससाठी स्मार्ट किचनही अद्ययावत इनोव्हेशन्स व किचन क्षेत्रातील आगामी ट्रेंड्सचा अनुभव घेऊन आधुनिक भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी चांगली संधी असेल.



Ultrafresh by Prestige



Jaypee Plus